शुक्रवार, ३० जून २०२३

सकाळ

शिंदेशाहीची वर्षपूर्ती

शिवसेनेत फूट पडून ४० आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. नाट्यमय घडामोडी होऊन एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे युती सरकार सत्तेवर आले. अनेक चढ-उतारांचा सामना करत या सरकारला आज (ता. ३०) एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्त मुख्यमंत्री शिंदे यांनी 'सकाळ'ला दिलेल्या मुलाखतीदरम्यान व्यक्त केलेल्या भावना...

विशेष मुलाखत

सुराज्याच्या दिशेने...

- **सरकारचे वर्षभरातील कामगिरीचे मूल्यमापन कसे कराल?**
- **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाने, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारानुसार आम्ही वर्षभरापूर्वी सरकार स्थापन केले. राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या अनुभवाचा खूप चांगला फायदा सरकार चालवताना होत आहे. दुरदृष्टीपासून आम्ही सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून निर्णय घेत आहोत. राज्यातील जनतेला आम्ही सरकारला मेटा आहोत. मी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मग ते मंत्रिमंडळातील सहकारी संपूर्ण एनर्जीने काम करीत आहोत. सामान्य माणसाच्या हिताचे निर्णय घेत आहोत. त्यामुळे आपले वर्षभराचे कामगिरी ही समाधानकारक दिशेने जाणारी आहे. सव्वा वर्षांपूर्वी हा एक वर्ष हा कालावधी फार मोठा वाटी. परंतु ती सुरुवात आहे. ती समाधान चांगली आणि दमदार झाली आहे.

  वर्षपूर्ती होण्याच्या आधी जी मंत्रिमंडळाची बैठक झाली त्यामध्ये आम्ही तीसहून अधिक निर्णय घेतले. राज्यातील वारिसहक्काच्या जमिनीचा आदिवासींना मालकी हक्काने देण्याचे काम आम्ही यात केले आहे, असे किताबी लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत.

- **तुमच्या सरकारची वर्षभराची दिशा काय राहिली आणि आगामी निश्चयपूर्वक काळात काय दिशा राहणार आहे?**
- मी मागची पहाटेच्यावेळचे एक स्वप्नांचा कहानीची हा जसा नकला होती मला सरकारची कामगिरी किती प्रभावी झाली याचे मूल्यमापन होऊ शकते. तसे झालेला शासित अडीच वर्षांत ते झाले यासाठी ते आपली एक वर्षाचा कालावधी पुरेसा आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात जी विकासकामांचे स्थगिती होती, ती होती त्या कामांना आम्ही वर्षभरात गती दिली. खासकरून नागपूरचे हित, राज्याचा गतिमान विकास, केंद्राचा सिंगापूरची तिलकाच्या वर्तीसारखे अत्याधुनिकरण तोपेकरून राज्यातल्या तळागाळातल्या माणसाचा विकास होईल. डोळ आपल्या सरकारची दिशा स्पष्टीने आहे. विरोधकांना विचार डोकावत देखून आम्ही काम करीत राहीं. अंतिम गोष्ट हे राज्याचा विकास हे आहे..

- **कोणत्या क्षेत्रात सर्वांत चांगले काम झाले आहे असे वाटते?**
- मी म्हणेन सर्वच क्षेत्रात चांगले काम झाले आहे. शेती, शिक्षण, आरोग्याचा विकास, कायदा सुव्यवस्थेची उपलब्धी, आरोग्य, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, शिक्षणाचे अन्याय असा वित्तीनी क्षेत्रात राज्य अग्रेसर राहून वाटचाल करीत आहे.

- **ज्या कामासाठी सरकार बनवलं तो कालचा आता कुठल्या टप्प्यावर आहेत?**
- महाविकास आघाडीच्या काळात राज्याचा जो विकास रखडला होता त्याला चालना देण्यासाठी आणि सामान्य माणसाच्या हितासाठी हे सरकार अस्तित्वात आले आणि हा उद्देश सफल होताना दिसून येत आहे.

- **आदीच्या युती सरकारच्या काळातील योजना महाविकास आघाडीने बंद केल्या असा आरोप तुम्ही करत होतात आता त्या योजनांची परिस्थिती काय आहे?**
- कलयुक्त शिवारसारखी फलदायी योजना आघाडी सरकारने बंद केली होती. ती आम्ही पुन्हा सुरू केली. त्या माध्यमातून सोयीस्कर विकास होऊ शकतो. मराठवाडावासीयांचा दुष्काळीपणाचा असा शिक्कासुद्धा आता अधिकृतपणे आली आहे. हे पोकळीचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आम्ही जलयुक्त शिवार - २ योजना सुरू केली.

- **मोठे उद्योग महाराष्ट्रात येत असल्याबद्दलची टीका होत आहे... या पार्श्वभूमीवर दावोसच्या दौऱ्याचे प्रत्यक्षातील फलित काय? कधीपर्यंत उद्योग सुरू होणार?**
- विरोधकांचे काम टीका करणे आणि त्यांच्या टीकेला चोख उत्तर देणे हे आमचे काम आहे. महाराष्ट्रात उद्योग येत नव्हते या टीकेला काही आधार नाही... खरं म्हणजे मी दावोस दौऱ्यावर गेले होतो त्या आर्थिक परिषदेत महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या एक लाख ५५ हजार कोटींचे सामंजस्य करार केले आहेत. याबाबत उद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत राज्यातील ४० हजार कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता दिली. त्यामुळे एक लाख ५० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. यामध्ये पहिला 'ई बस' निर्मितीचा प्रकल्प मुख्यात होत आहे. उद्योग बाहेर जात आहेत या मध्ये ही एवढी गुंतवणूक कुठे होत आहे, याबद्दल विरोधकांनी स्पष्ट केले पाहिजे.

महाराष्ट्रातले शिवार करायचेय संपन्न

महाराष्ट्राच्या जनतेने दिलेला कौल आम्ही पुनर्प्रस्थापित केला याला आज एक वर्ष पूर्ण होते आहे. खरे तर महाराष्ट्राने आम्हाला, म्हणजे भाजप-शिवसेना युतीला कौल दिला होता. सत्तापिपासू वृत्तीमुळे वैचारिक बांधिलकीचीही तमा न बाळगता वेगळे काही घडले. महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आल्याने महाराष्ट्रातले निर्माणाधीन प्रकल्प मागे पडले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाल्यानंतर मागील एक वर्षापासून आम्ही महाराष्ट्रासाठी एकदिलाने प्रयत्न करतो आहोत.

देवेंद्र फडणवीस,
उपमुख्यमंत्री

जागतिक पातळीवर महाराष्ट्राचे पत पहिले असले, हळहळ वसलेल्या गावसाधुंचे शेतकरी कुपोषितांचा प्रश्न होता.

औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्राने पुन्हा एकदा क्रमांक एकचे स्थान मिळवले आहे. विदेशी गुंतवणूकदार स्वैर असलेल्या प्रांतात गुंतवणूक वाढावी, उद्योग स्थापन व्हावेत प्रयत्न होतात. महाराष्ट्र या क्षेत्रात कायम आघाडीवर असेल. शेती हा आमच्या प्राधान्याचा विषय आहे. कोविड काळात अर्थव्यवस्थेला सक्षम आधार दिला तो शेतीने. महाराष्ट्रातील शेती सदैव पहली गावर आमच्या सरकारचा भर असेल. मागील संपूर्ण वर्षात अडकी शेतकऱ्यांना अडचणीत देणारे अनेक निर्णय घेतले आणि शेतीत प्राण फुंकण्यास प्रयत्न दिले आहे. शेतीला पाणीपुरवठा होत राहावा यासाठी 'जलयुक्त शिवार' योजना पुन्हा जोमाने सुरू केली. त्याबरोबरच मागेल त्याला शेततळे योजनेचा विस्तार हा या वर्षातला प्रमुख कार्यक्रम राहिला आहे. यात लवकर हेक्टर जमीन जी कमीची अधिसूचनाही आलेली नाही, ती अट जाचक असल्याचे प्रकल्प सुरू झाले आहेत. २७ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ७० हजार कोटी सिंचनावर खर्च करावे आहेत. त्यातलाच पाण्याअभावी खोळंबलेला अमृत तेवे पाणी पोहोचवले जातील.

शेती आर्थिकदृष्ट्या सक्षम करायची असेल तर सिंचन प्रवेश अन् ते किफायतीत पोहोचवणारी ऊर्जा व्यवस्थाही हवी. त्यासाठी शेतीला दिवसाच वीजपुरवठा करणारी व्यवस्था निर्माण करण्याचा आम्ही चंग बांधी आहोत, यौर ऊर्जेचा तरोच अपारंपरिक तंत्रज्ञानांचाच वापर करून आम्ही पीकनिर्मिती करणार आहोत. त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था तयार होते आहे. ही गोष्ट केवळ शेतकऱ्यांना फुलण्याची ही गोष्ट असेल. केवळ एक स्वप्नात पाहिजेच हे आमचे एक पाऊल आहे. दुरितांचे पाय आंतरराष्ट्रीय स्तरावर युक्रेन-रशिया संघर्षामुळे मंदावले आहेत.

कोटींचे रस्ते बांधले जाणार आहेत. समृद्धी महामार्ग हे तर एक स्वप्न होते, ते प्रत्यक्षात साकारले आहे. आता महाराष्ट्राच्या प्रत्येक पापातले डाग्यावर समृद्धीमार्ग उपलब्ध असलेल्या वेगरहितीने, आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचू शकेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. नाग-बीड-पाडळी, चनसल- पंढरपूर, कोंढ-शिरूर-चाकण, बदलापूर-पेलाईगंज-गडचिरोली, शेलापूर-गुहागर-पागोशिव या रेल्वेमार्गाचे काम होते आहे. रस्ते प्रगती पेक्षन गेलाय. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात रस्ते असे जोडे गेले पाहत असतानाच शहरांमध्ये असलेल्या महामुंबई परिसरात अडकी पडलेल्यांना दूर करते आहोत. मेट्रोचे काम जोर पकडते होते. आता मुंबईतील मेट्रो २ आणि मेट्रो ७ सुरू झालेल्या आहेत. मेट्रो ३ साठवर अडली आहे. कोरडात रेडचे काम अन्तर्गिक्षा पूर्ण झाले आहे. त्यामुळेच राज्य अधिकाधिक गतिमान करणारे हे मार्ग प्रगतीच्या खुणा आहेत. लॉकडौनकाळ त्यामुळे सुरुवात मेलाय आहे. गृहनिर्माण योजनेला गती मिळाली आहे. प्रतीक्षेला संपत देणाऱ्या स्टार्ट अप योजना सुरू झालेल्या आहेत. महाराष्ट्र पुनिर्कर्षाचे मार्गेलपर आहे. याहिती तंत्रज्ञान धोरणात बदल केले आहेत.

महिला विकासाचा केंद्रबिंदू

महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारसरणीची सर्वत्र प्रशंसा होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत मी, माझे सहकारी जेव्हा विविध भागांत कार्यक्रमांना जातो तेव्हा महिलांचा सहभाग अन् त्यांचे समाजकार्यातले योगदान ठळकपणे समोर येते. त्यांच्या दृष्टीने महत्त्व देणारी व्यवस्थाच निर्माण करणे, हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आम्ही एसटी प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत दिली आहे ती त्यांना सक्रीय होता यावे यासाठीच. त्या योजनेला मिळालेला प्रतिसाद सुखावणारा आहे. लेकीचे शिक्षण, त्यांची सुरक्षितता याबाबतही सरकार वेगवेगळी पावले उचलतेय. सामाजिक न्यायाचा भाग्यात मिळणारी घरांची यादी असो किंवा शेतकऱ्यांचे प्रकल्प राबवले जात आहेत. महाराष्ट्र क्रमांक एकचे राज्य होते आणि राहील. आमच्या सरकारने या आघाडी त्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. आगामी काळात हे निर्णय अधिक गतीमान होतील.

ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न

महाराष्ट्राने ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होण्याचे स्वप्न पाहिले आहे. या वर्षात त्यादृष्टीने 'इलेव्हन ट्रिलियन'चा टप्प्यावर पोहोचलो आहोत. उद्योग, सेवा व शेती पंचम विकासाद्वारे ही वाटचाल करायची आहे. पंढरपूर महालिंगराजांची पुनर्निर्मिती करून परिसरात जगातील उत्तमोत्तम पर्यटन केंद्र व डॉक्टरांची संकल्पना साकारणे हे उद्दिष्टही या वर्षात साध्य करायचे आहे

महाराष्ट्रासारख्या देशातल्या सर्वांत प्रगत, पुरोगामी राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळूनही, जनतेचा पाठिंबा आणि आमदारांचा विश्वास नसल्याने मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे आजवरचे सर्वांत अपयशी मुख्यमंत्री ठरले आहेत. मुख्यमंत्र्यांची वर्षभरातील कामगिरी अत्यंत सुमार आहे. सरकारला वर्ष होऊनही मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही, हे एक उदाहरणही सरकारच अपयश, डळमळीतपणा स्पष्ट करण्यासाठी पुरेसे आहे.

अजित पवार,
विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा

सरकारमध्ये आत्मविश्वास व निर्णयक्षमतेचा अभाव

राज्यातील सध्याचे सरकार हे महाराष्ट्रात कधीतरी सरकार नाही. सुरत, गुवाहाटी, गोव्यात चुटेवारी ते जन्माले आणि महाराष्ट्रात आणून बसवण्यात आले. राज्यावर लादलेल्या सरकारने लादलेले हे सरकार असल्याची इथली जनतेच्या आहे. इथल्या मातीतली सरकारची चाड कधीच्यांसाठी चुकारी नाही. शिंदेगटासह शिवसेनेतून बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांना मानणारा शिवसैनिक, शिवसेनेच्या विचारांवर पहिल्या दिवसापासून सरकारबरोबर सूत राहिला. भाजपचे १०५ आमदार एकनाथराव शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शपथ घेताना. खरे. शिंदे गटाचे मुख्यमंत्री होणे भाजप कार्यकर्त्यांच्या पचनी पडलेले नाही. त्यांच्यातही असंतोष आहे.

मुख्यमंत्रिपदाची पार्श्वभूमी होऊनही एकनाथराव शिंदे यांच्यात महाराष्ट्राचा राज्याचा मुख्यमंत्री होण्यासाठी आवश्यक असलेला आत्मविश्वासाचा, निर्णयक्षमतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. खरे पाहिल्यास तर सरकारचे शिंदे सरकार चालवत नाहीत तर सरकारचे संचालक आहेत. महाराष्ट्रहिताचा कोणताही निर्णय घेण्याचे अधिकार या सरकारकडे नाहीत. ते अधिकार 'अदृश्य महाशक्ती'ने राखून ठेवले असून त्या महाशक्तीच्या इशाऱ्यांवर महाराष्ट्रातील सध्याचे सरकार चालत आहे. गेल्या वर्षभरात महाराष्ट्रहिताचा, राज्यहिताचा कोणताच ठोस निर्णय घेले शिंदे सरकारला शक्य झालेले नाही.

सर्वोच्च न्यायालयाचे फटकार

मुळात, ज्या परिस्थितीत आणि पद्धतीने वर्षभरापूर्वी राज्यात हे सरकार स्थापन झाले ती पद्धतच लोकशाही व्यवस्था, संसदीय प्रणालीची हत्या करणारी होती. सर्वोच्च न्यायालयाने सरकार स्थापनेच्या पद्धतीवर, कायदेशीर बाजूंवर घेतलेल्या अनेक गोष्टी केवळपत्र ताशेरे ओढले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने वर्षभरापूर्वी सरकार स्थापनेसंदर्भात तत्कालीन राज्यपाल महोदयांनी घेतलेली भूमिका आणि बहुमत चाचणीचा दिलेला आदेश चुकीचा ठरवला आहे.

पान २ वर

वारकऱ्यांवर लाठीमार निषेधार्ह

शिंदे सरकारच्या काळात गुन्हेगारांना संरक्षण दिले जात आहे, समाजात तेढ निर्माण करणाऱ्या शक्तींना बळ दिले जात आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या आदरार्थ कलम-चांगल्या कारवाई होत नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेवर आक्रमणाचे सत्र सुरूच आहे. मागील महिन्यात राज्यपालांच्या काही वादग्रस्त वक्तव्यांनी उसळलेला त्यात सामान्य नागरिकांसह बळी गेला. लोकांच्या घरांनी, वाहनांनी, दुकानांचे नुकसान झाले. ही दंगल घडवणाऱ्यांवर, प्रक्षोभक वक्तव्ये करणाऱ्यांवर शिंदे सरकारने कोणती कारवाई केली नाही. दोषारोपांना, समाजविघातक शक्तींना तीव्रतेने कठोर शासन करण्याचे सोडून मुख्यमंत्री शिंदे - फडणवीस सरकार पंढरपूरच्या वारीला निघालेल्या वारकऱ्यांवर मात्र लाठ्या-काठ्या चालवते. वारकऱ्यांवर लाठीमार करते. पंढरपूर वारीच्या इतिहासात जे घडले नव्हते ते, शिंदे सरकारच्या कार्यकिर्दीत घडले. वारकऱ्यांवरील लाठीमाराचा निषेध करावा तेवढा थोडा आहे.

आतील पानांत

- उलथापालथींचं वर्ष
- सरकारी योजना : चौथ्या वर्षात पहिले पाऊल
- निवडणुकीला सामोरे जाताना
- कृषी क्षेत्रातील कामगिरीचा घसरता आलेख
- धोरणाला दिशा मिळाली, पण गती हवी

सकाळ

वर्षभरातील निर्णय

उद्योग

- दावोस येथे महाराष्ट्रात **९ लाख ५५ हजार कोटींच्या** गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार
- राज्यात ७० हजार कोटींच्या प्रकल्पांना मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत मान्यता. ५५ हजार रोजगार निर्माण होणार
- मुख्यमंत्री रोजगार निर्मितीतून बारा हजाराहून अधिक उद्योजकांना कर्ज मंजूर. एक लाखाहून अधिक युवकांच्या हाताला काम. या वर्षात एकूण १२ हजार ३२६ कर्ज प्रकरणे मंजूर
- कृषी, ऑटोमोबाईल, उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना उद्भवणाऱ्या समस्या 'संकल्प' प्रकल्पाद्वारे केंद्रकडून सोडविले जातील.
- महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कार्यान्वित. उद्योगांसाठी ११९ सेवा सुलभ आणि अधिक वेगवान.
- महाराष्ट्रात ९ नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, शिवंडी, पुणे येथे ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येतील.
- जेएसडब्लू, कोकणामध्ये सुमारे ४२०० कोटींची गुंतवणूक करणार. पेण येथे १६० मे.वॅ.चा पीएसपी प्रकल्प होणार.

पायाभूत सुविधा

- आशियातील सर्वांत मोठ्या समूह पुनर्विकास योजनेचा ठाण्यात शुभारंभ. पहिल्या टप्प्यात सुमारे १० हजार घरांची निर्मिती होणार
- मुंबईच्या सुशोभीकरणाचे ११५० उपक्रम सुरू. १७२९ कोटी रुपये खर्च
- नागपूर मेट्रो रेलच्या पहिल्या टप्प्याचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन आणि नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी
- खडकवासला-स्वारगेट पुलगेट हडपसर-लोणी काळभोर या मार्गावर मेट्रो रेल्वे प्रकल्प
- पुणे रिंगरोडच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला अडीचशे कोटी
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग आता नागपूर-शिर्डी-भरवीरपर्यंत खुला. नागपूरपासून गडचिरोलीपर्यंत मार्ग वाढविणार
- मुंबई कोस्टल रोडचे सुमारे ६२ टक्के काम पूर्ण. कोस्टल रोडला छत्रपती संभाजीराजे यांचे नाव देणार
- नीति आयोगाप्रमाणेच राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र १ जानेवारी २३ पासून कार्यरत. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचीही स्थापना
- उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड तसेच टोरंट पॉवर लिमिटेड यांच्याशी अनुक्रमे रू. ४४ हजार कोटी व रु. २७ हजार कोटींचे सामंजस्य करार

महिला

- महिलांना एसटी प्रवासात सरसकट ५० टक्के सूट
- पर्यटन व्यवसायात महिलांचे सक्षमीकरण व्हावे म्हणून "आई" हे महिला केंद्रित (Gender Inclusive) पर्यटन धोरण राबविणार
- महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून १५ जिल्ह्यांत अल्पसंख्याक महिलांचे नवीन २,८०० बचत गट
- नोकरदार महिलांसाठी ५० वसतिगृहे. 'शक्तिसदन' ही नवी योजना
- महिला सुरक्षा, सुविधाजनक प्रवासासाठी महिला केंद्रित पर्यटन धोरण करणार
- बालसंगोपन योजनेअंतर्गत बालकांच्या संगोपनासाठी परिपोष अनुदानात एक हजार ९०० वरून २ हजार २५० रुपये वाढ

• Registered • Date of Publication : शुक्रवार, ३० जून २०२३ • Posted at RPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR/२००७/२७, पी. ई. पी./डी.जे./०९१/२०२१-२०२३.

सरकारी योजना:

चौथ्या वर्षात पहिले पाऊल

सत्तेवर आल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारने योजनांचा धडाका लावला. कृषी क्षेत्रातील योजनांवर सरकरने भर दिला आहे. मात्र यासाठी आर्थिक शिस्तीचे आव्हान आहे.

सम्राट फडणीस,
samrat.phadnis@esakal.com

महाराष्ट्र सिंहासनारोहण २०१९ च्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर जवळपास सव्वा महिन्याचा काळ सरकारविना होता, त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली २८ नोव्हेंबर २०१९ रोजी महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. या सरकारच्या स्थापनेपूर्वी किमान समान कार्यक्रम ठरला, त्यामध्ये शेती या मुख्य मुद्द्याभोवती पाच तपशील समाविष्ट होते. फडणवीस-महाजन युतीसरकारच्या शेतकऱ्यांना मदत, शेतकऱ्यांना कर्जमाफी, युतीसरकारच्या शेतकऱ्यांना पीकविम्याचा लाभ, शेतमालाला योग्य भाव आणि शेतीला शाश्वत पाणीपुरवठा हे पाचही मुद्दे सरकारी योजनांशी संबंधित होते. ठाकरे सरकारचा पहिलाच अर्थसंकल्प येता येता कोविड१९ ची जागतिक साथ आली आणि अन्य सर्व योजना गाशे पडल्या. आरोग्याला प्राधान्यक्रम आला. सरकारचे दुसरे वर्षही कोविड१९ मध्ये खर्चण्यात गेले, तिसऱ्या वर्षी २२ जून २०२२ रोजी ठाकरे सरकार कोसळले आणि ३० जून २०२३ रोजी एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस यांचे सरकार अस्तित्वात आहे, या सरकारला सावरण्यात जवळपास तीन तिमाही गेल्या. आता शिंदे-फडणवीस सरकारचीही वर्षपूर्ती आहे. याचा अर्थ सलग्न मिळून चार वर्षांचा दौर सरकारचे कामकाज महाराष्ट्रातील जनतेने पाहिले आहे आणि दीर्घकालीन परिणामकारक अशा कल्याणकारी योजनांचा सुरुवात झाली आहे. ठाकरे सरकारचा प्राधान्यक्रम ठरता ठरता कोविड१९ ची साथ आली आणि शिंदे-फडणवीस सरकारचा प्राधान्यक्रम ठरण्यास ९ मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पापासून सुरुवात झाली. शेती, उद्योग, शिक्षण, रोजगार, महिला, बालके, सामाजिक न्याय अशा विविध विभागांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या स्वतःच्या कल्याणकारी योजना विकासाच्या एकूण प्रक्रियेत महत्त्वाच्या ठरणार आहेत. तसा महाराष्ट्राला इतिहास आहे.

सरकारी योजनांचे महत्त्व

राज्याच्या २०२२-२३ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न दोन लाख ४२ हजार २८० रुपये आहे. २०१५-१६ मध्ये हे उत्पन्न एक लाख ४६ हजार ८१५ रुपये होते. राज्याचे उत्पन्न ९५. ४३२ रुपयांनी वाढले, या उत्पन्न वाढीमध्ये सरकारने उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आखलेली धोरणे जशी कारणीभूत आहेत, तसेच समाजातील सर्व घटकांना आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सादर केलेल्या योजनांचाही वाटा आहे. जलयुक्त शिवार योजना २०१५ मध्ये सुरू झाली. राज्यातील टंचाईग्रस्त पाच हजार गावे दरवर्षी शिवडून ती पाणी समृद्ध करण्याचा या योजनेमध्ये गावतील जलस्रोतांचे पुनर्भरण, खोलीकरण झाले. योजना उलपहेल्या राबविलेल्या गावांमध्ये त्याचा लाभ झाला. हा विषय फक्त चाण्यापुरता मर्यादित राहिला नाही. पाणी उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांना हमखास पीक घेता आले, दुहेरी पिकाचे गणित अनेक ठिकाणी बसवता आले, त्यातून रोजगार वाढला, जमिनींना चांगला दर उपलब्ध झाला आणि त्यांची उपयुक्तता वाढली. एका योजनेचे असे अनेक परिणाम झाले. प्रत्येक गावात ही योजना पोहचली डाली, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. तथापि पुणे, नगर, ठाणे, चारशिव, सोलापूरपासून ते विदर्भातही उलपहेल्या योजना राबविल्याने गावांना पाण्यातून समृद्धी निर्माण करता आली. महाराष्ट्राचे दरडोई सरासरी उत्पन्न वाढण्यामध्ये अशा अनेक योजनांचा सम्बंधेश असतो. गेल्या चार वर्षांत महाराष्ट्राने राबविलेली अशी व्यापक योजना जवळपास येत नाही. कोविड१९ मधून सिकून अर्थव्यवस्था पटाळीस आणण्याच्या योजनेचाही अभाव आहे.

केंद्राच्या योजनांची भर

राज्याच्या उत्पन्नाचा मोठा वाटा केंद्रकडे जातो आणि केंद्रीय योजनांच्या निधीद्वारे तो राज्यात परतही येतो, या चक्रामध्ये निधीच्या प्रवाहात महाराष्ट्रापेक्षा आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश २०१९ पासून आघाडीवर आहेत. केंद्रीय योजनांची व्याप्ती आणि विस्तारला निधी मोठा असतो. उदा. स्मार्ट सिटी मिशन योजनेतून केंद्र सरकारने सुमारे ४५ हजार कोटी रुपये विविध शहरांवर खर्च केले, महाराष्ट्राच्या वाट्यालाही हा निधी आला. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या योजनेची अंमलबजावणी ठाकरेंने झाली नाही. परिणामी, योजनेचा अपेक्षित परिणाम ना केंद्रला मिळाला ना राज्याला. किमान महाराष्ट्रातील ही परिस्थिती आहे. अशा अनेक योजनांमधून केंद्राचे पैसेही राज्यात येतात. तसेच, या योजनांची अंमलबजावणी न झाल्यास निधीचा एकतर विनियोग होत नाही अथवा खर्च केलेला पैसा वाया जातो. महाराष्ट्रातील राजकीय अभ्यासांचा आणि केंद्र-राज्य संबंध सांगण्याचा फटका राज्याला निधीच्या पाठपुरावर चालण्याचे चालला येत नाही.

आर्थिक नियोजनाचे आव्हान

शिंदे-फडणवीस सरकारच्या योजनांचे लक्ष्य गट सर्व आर्थिक स्तरातील शेतकरी आणि महिला असल्याचे योजनांवरून स्पष्ट दिसते. योजनांची अंमलबजावणी करताना सरकारसमोर कार्यक्षमतेची मोठी आव्हाने उद्भवणार आहेत. शहरी-निमशहरी आणि ग्रामीण योजनांमध्ये समतोल हे प्रमुख आहे. योजनांसाठी उलपहेल्या आर्थिक तरतुदीची वास्तवात जागीच करून खर्ची लागणार आहे, या सर्वांहून महत्त्वाचे आव्हान आहे, ते आर्थिक नियोजनाचे.
योजनेतून तेजून नंतर योजनांना आर्थिक राचणी लागतो, तर सरकारला मोठा फटका बसू शकतो. जलयुक्त शिवार आणि किंवा कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी ठाकरेंपासून अधिक काळ सुरू असलेले राजमाता जिजाऊ मिशन असो, या योजनांमुळे महाराष्ट्रामध्ये काही उत्तम उदाहरणे निर्माणही राचार झाले. केवळ उदाहरणांपुरताच योजना होऊ नयेत आणि त्या महाराष्ट्राच्या विकासाचे इंजिन ठराव्यात, ही दुसऱ्या वर्षात पदार्पणानिमित्त शिंदे-फडणवीस सरकारकडून अपेक्षा आहे.

योजना आणि मतदार

सरकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून लाभार्थ्यांचे मतदारसंघांमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न भाजपने २०१४ पासून सातत्याने केला. त्यासाठी योजनांचा प्रचार-प्रसार व्यापक केला. विशेषतः सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या योजनांची मोठी प्रसिद्धी करण्यात आली. उज्ज्वला गॅस ते श्रमिक घरकुल योजना या लक्ष्य समूहासाठी होत्या. लाभार्थ्यांचे हक्काच्या मतदारसंघांमध्ये रूपांतर हा स्वतंत्र विषय आहे, तथापि, भाजपचे व्यूहरचनेत सरकारी योजनांचे महत्त्व यावरून लक्षात येते. या पार्श्वभूमीवर शिंदे-फडणवीस सरकारकडून हक्काचे मतदार निर्माण करणाऱ्या योजनांची अपेक्षा व्यक्त होत होती. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ मार्च २०२३ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात त्यादृष्टीने पाऊल पडले आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सादर झाली. या योजनेतून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक केंद्रीय निधीतून सहा हजार रुपये दिले जात आहेत. दोन्ही योजना मिळून वार्षिक बारा हजार रुपयांचा निधी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिला जाईल. याशिवाय, लग्नाच्या आत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबात मुलगी जन्माला आली, तर तिला शिक्षणासाठी सावलती आणि पयाच्या ९८ या वर्षी ७५ हजार रुपये देण्याची योजना राज्याने सादर केली, एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलांना पन्नास टक्के सवलत जाहीर केली. याशिवाय महिलांना व्यावसायिक कर भरण्याची मर्यादा वाढवली.

निवडणुकीला सामोरे जाताना..

पुढील वर्ष राज्यासाठी निवडणुकांचे वर्ष असणार आहे. विविध दावे-प्रतिदावे करताना, गृहितके मांडताना आधीच्या निवडणुकांचे आकलन करणे अगत्याचे आहे.

शीतल पवार
shital.pawar@esakal.com

निवडणुकांच्या निमित्ताने दावे प्रतिदावे होत राहतात. महाराष्ट्रात गेल्या काही निवडणुकांदरम्यान अनेक 'नॅरेटिव्ह' चर्चेत आले. त्यामध्ये २०१४ ला मोदी लाट होती म्हणून काही लोक निवडून आले किंवा काही निवडणूक हरले अशी मांडणी आहे. पक्षांतर करणाऱ्यांना लोके निवडून देत नाहीत असेही दावे केले गेले. कुठे संधिधा आणि केसौअरा साराख्या पक्षांना 'बी टीम' वगैरेही म्हटले जाते. प्रचारासाठी दावे - प्रतिदावे ठीक असले तरी निवडणुकीच्या राजकारणात प्रत्येक पक्षाने आणि उमेदवाराने वर्ष शास्त्रात गृहीत धरणे आवश्यक आहे. ही गृहितके निश्चित करताना महाराष्ट्राच्या गेल्या तीन विधानसभा निवडणुकांचे आकडेवारी महाराष्ट्राच्या मतदारांचे आकलन सांगणारी आहे.

महाराष्ट्रात एकूण २८८ विधानसभा मतदारसंघ आहेत. यापैकी सुमारे ७८ मतदारसंघात सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये (२००९, २०१४, २०१९) एकाच पक्षाने किंवा उमेदवाराने सातत्याने यश मिळवले. त्यापैकी २४ ठिकाणी भाजप, १८ जागांवर काँग्रेस, १९ अजितदार राष्ट्रवादीचे तर १२ आमदार शिवसेनेकडून निवडून आलेले आहेत. महाराष्ट्रात २१ मतदारसंघ असे आहेत जिथे कोणताही पक्ष आला तरी इथे उमेदवाराकडे वळून गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये मतदार झाले आहे. यापैकी सर्वाधिक म्हणजे १४ उमेदवार २०१९ च्या निवडणुकीत भाजपकडे होते. उमेदवार आणि पक्ष या दोन्हींच्या पाठीशी उभा राहणाऱ्या मतदारसंघांचा पॅटर्न या आकडेवारीतून दिसतो.

उमेदवारांच्या निवडीला महत्त्व

महाराष्ट्रात २८८ पैकी सुमारे ७८ मतदारसंघात सलग तीन वर्ष एकाच पक्षाकडे सत्ता कायम आहे. या सर्व मतदारसंघात सातत्याही, पक्षाची ताकद, उमेदवार प्रतिमा, जाती - समाजाचे मतदान अशा अनेक कारणांमुळे एकाच पक्षाकडे सत्ता कायम राहिली. पुणतर, चोकर असे मतदारसंघ पारंपरिक पराभवांकडे तर माळेगाव बाद्ध किंवा कऱ्हाड दक्षिणसारखा मतदारसंघात पक्ष आणि उमेदवाराची सांगड घालून गेल्या तीन विधानसभा निवडणुकांना सत्ता कायम राहिली आहे. मात्र २०१९ च्या निकालानंतर महाराष्ट्रात 'मविआ पॅटर्न' अस्तित्वात आला. पुढे शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री बनले. परिणामी स्थानिक पातळीवर अनेक राजकीय समीकरणे बदलली. आजही अनेक मतदारसंघात गेल्या निवडणुकीचा ट्रेंड कायम दिसतो. काही मतदारसंघात निवडणुकांचे बल बदलू शकतील मात्र त्याचे प्रमाण आजच्या परिस्थितीत कमच आहे. उमेदवाराची निवड हा सर्वच पक्षांसाठी आपत महत्त्वाचा घटक ठरेल.

सलग तीन निवडणुकांमध्ये एकाच पक्षाकडे सत्ता कायम राहिलेले मतदारसंघ:

काँग्रेस (१८) : अक्कलकुवा, रिसोड, शिवाजी, देगलूर, खानापूर, भोकर, इस्लामपुरी, मालाड पश्चिम, धारावी, मुंबादेवी, भोर, संगमनेर, औरंगपुरा, लातूर शहर, लातूर ग्रामीण, सोलापूर शहर मध्य, कराड दक्षिण, चंदूर - कडेगाव.

भाजप (२४) : शिंदखेडा, जामनेर, जळगाव (जामोद), अकोला पश्चिम, मूर्तिजापूर, वाशीम, हिंगणा, नागपूर दक्षिण पश्चिम, नागपूर पूर्व, नागपूर मध्य, जामठी, तिरोडा, बल्लारपूर, डोंबिवली, कोरेगाव, मुलुंड, चारकोप, गोरेगाव पूर्व, मलबार हिल, पर्वती, पनवेल पेण (पेटलिवडपुर्वित कॉलिस मिळवणी), सोलापूर शहर उत्तर, मिरज, सांगली

राष्ट्रवादी काँग्रेस (१६) : पुसद, फलटणकी, येवला, गुंजा खटाव, श्रीरंगपेठ, अकोला, बारामती, अकोले, बीड, माढा, गेहोळ, फलटण, चंदगड, कागल, इस्लामपूर, तासगाव- खानापूर-कवठेमहांकाळ

शिवसेना (१२) : पेडकर, दिग्रस, पाचपाखाडी, औरंगाबाद पश्चिम, माहोगाव बाद्ध, अंबरनाथ, ओवळा माजिवाडा , कोपरी - पाचपाखाडी, जोगेश्वरी पूर्व, महाड, उमरगा, राजापूर

स्वतंत्र लढल्याचा भाजपला लाभ

विधानसभेच्या २००९ च्या निवडणुकीत शिवसेना आणि भाजपमे युती म्हणून निवडणूक लढवली. त्यावेळी शिवसेनेने १६० जागा लढवल्या आणि ४४ जागा जिंकल्या. भाजपने ११९ जागा लढवून ४६ जागांवर विजय मिळवला. शिवसेनेने मराठवाडा, पूर्व विदर्भ आणि मुंबई-ठाणे पट्ट्यात पारंपरिक प्रभाव दाखवला. भाजपलाही विदर्भात मोठ्या प्रमाणात यश मिळाले. युतीसाठी २०१४ ची निवडणूक निर्णायक ठरली. विधानसभेच्या निवडणुकीत कोणतीही युती - आघाडी न होता सर्व प्रमुख राजकीय पक्ष स्वतंत्र निवडणूक लढले. निवडणुकांचे निकाल लागले आणि भाजपने १२२, तर शिवसेनेने ६३ जागा जिंकल्या. २००९ च्या तुलनेत ४४ पैकी फक्त २२ जागा शिवसेनेला २०१४ मध्ये कायम राखता आल्या. याउलट २००९ च्या तुलनेत भाजपने ४६ जागांपैकी ३१ जागा पुन्हा जिंकल्या. सर्व पक्ष स्वतंत्र लढल्याचा सर्वाधिक फायदा भाजपला झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट दिसते. निकालांचे मतदारसंघनिहाय विश्लेषण केल्यास शिवसेनेच्या मताधिक्यावर सर्वाधिक परिणाम दिसून येतात. २००९ च्या तुलनेत शिवसेनेने जिंकलेल्या १२ जागा २०१४ मध्ये भाजपच्या पाडवात गेल्या. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची गड मानलेल्या मतदारसंघात शिवसेनेचा पराभव केला. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने लढविलेल्या ५२ पैकी ३२ जागांवर सेनेला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. याउलट भाजपने एकूण जागा शिवसेनेला गमावल्या, ज्या ५२ जागांवर भाजप आणि शिवसेना दोघांचे दावेदार होते, त्यापैकी २० जागा मुंबई-ठाणे पट्ट्यातल्या होत्या, त्यातील १३ जागा जिंकून भाजपने शिवसेनेला मोठा धक्का दिला. परिणामी शिवसेनेचे प्रभावक्षेत्र मर्यादित करण्यात भाजपने यशही मिळवले.

मतविभाजन आणि भाजपला फायदा

महाराष्ट्रात संधिध आणि एआयएमआयएम साराख्या पक्षांना सत्ता चालवणी 'बी टीम' असल्याचा आरोप केला जातो. अर्थात त्याची काही कारणेही आहेत. महाराष्ट्र जाती - समाज - व्यक्ती यांच्या प्रभावात मतदान करतो. परिणामी प्रत्येक राजकीय पक्षाचा एक जनाधार इथे आहे. त्यात दलित आणि मुस्लिम मते निर्णायक भूमिका बजावतात. या घटकांचा पारंपरिक कल काँग्रेसच्या बाजूने राहिला आहे. त्यामुळे त्यांच्यातून उदयाला येणाऱ्या पक्षाचा जनाधार वाढला तर त्याचा थेट फटका काँग्रेसला बसतो. उदाहरणार्थ २०१४ च्या निवडणुकीत भिवंडी पश्चिममध्ये काँग्रेसला ३१५७७ मते मिळाली, तर भाजपला ४२४८३ मते मिळाली. एमआयएमला ४८८६ मते मिळाली, जी काँग्रेसकडे गळली असती तर काँग्रेसचा विजय मिळवता आला असता. मात्र २०१४ साली सर्व प्रमुख पक्ष स्वतंत्र लढले होते आणि भाजप - शिवसेना तसेच काँग्रेस - राष्ट्रवादी आणीही मतांची विभागणी झाल्याचा दिसतो. २०१९ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीला पूरेसे यश मिळाले नसले तरी दहा ठिकाणी वंचितच्या उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. काँग्रेस राष्ट्रवादीच्या उमेदवारांना २५ जागांवर वंचित उमेदवारांना मिळालेल्या मतांचा थेट फटका बसला होता. सध्या संधिधे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबरोबर काडीमोड घेतले आहे, पण त्यांच्या निवडणूक व्यूहरचनेबद्दल अजून पुरेशी स्पष्टता नाही.

ठाकरे विरुद्ध शिंदे

राजकीय वर्तुळात मिळणारी सहानुभूती ही आज जरी उद्धव ठाकरेंची जमेची बाजू असेल तरी निवडणुकांसाठी आवश्यक असलेले संघटन, पक्ष रचना, ताकदीचे उमेदवार या सर्वच पातळ्यांवर त्यांना निकराची लढाई द्यावी लागणार आहे. मविआमधेही जागांची जुळवाजुळव हा कळीचा मुद्दा असेल, असे आकडेवारीचे विश्लेषण सांगते. शिवसेनेत फूट पडल्यानंतर ठाकरेंबोबत नसलेल्या सर्व आमदारांच्या राजकीय भविष्याबद्दल अनेक तर्क लावण्यात आलेले आहेत. पण त्यातील निम्म्याहून अधिक आमदारांना स्थानिक गणिते सांगाळली तर निवडणुकीत अडचण येणार नाही, अशी परिस्थिती आहे. शिंदेंच्या शिवसेनेतील जवही सदस्य पाच हजारांहून जास्ती मतांच्या फरकाने निवडून आलेले आहेत. शिवाय अनेक ठिकाणी विरोधातील उमेदवार सध्या भाजप किंवा राष्ट्रवादी किंवा काँग्रेसमध्ये सहभागी झालेले आहेत. अशावेळी त्यांच्यासाठी निवडणूक सोपी नक्कीच नसेल. वानमध्ये सांगोला, चांदिवली, पाचोरा अशा काही मतदारसंघांचा समावेश आहे.

सकाळ

शिंदेशाहीची वर्षपूर्ती

वर्षभरातील निर्णय

शिक्षण

- आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना गोफत गणवेश
- व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी २० उमेदवारांना रु. १० हजार प्रतिमाह विद्यावेतन देणार
- श्री क्षेत्र सिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करणार
- खासगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीची योजना अभिमत विद्यापीठांकरीता लागू. २१ अभिमत विद्यापीठातील १४ हजार २३२ विद्यार्थ्यांना लाभ
- इतर मागास प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी आणि मुलींसाठी प्रत्येकी एक अशी ७२ शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास मान्यता.
- २५० शासकीय आदिवासी आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा करणार
- अनुसूचित जमातीच्या १०० विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी अधिछात्रवृत्ती
- बालेवाडी पुणे येथे स्पोर्टस सायन्स सेंटर उभारणार. छत्रपती संभाजीनगर येथे नवीन क्रीडा विद्यापीठास ५० कोटी

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाला भेट.

रोजगार

- शिपाई रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी पदभरती निर्बंधातून सूट. २० हजार पोलिस शिपायांची पदे भरण्याचा मार्ग मोकळा.
- मराठा युवकांच्या शासकीय नोकरीत नियुक्तिसाठी अधिसंख्य पदे निर्माण. नियुक्ती प्रक्रिया सुरू.
- स्व. अण्णासाहेब पाटील महामंडळाचे पुनरुज्जीवन. ५० हजार मराठा तरुणांना उद्योजक होण्याची संधी
- मराठा समाजासह अन्य प्रवर्गातील सुमारे १ हजार ६४ उमेदवारांना अधिसंख्य पदांवरील नियुक्तिचे पत्र. त्यातील ७८ उमेदवारांना प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्तिपत्रे.
- मुंबई ही फिनटेक स्टार्टअप कॅपिटल बनली आहे.

महाड येथील चवदार तळ्याजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना मुख्यमंत्री व त्यांचे सहकारी.

उलथापालथींचं वर्ष

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली युती सरकार सत्तेवर आल्यानंतरच्या गेल्या वर्षभरात अनेक राजकीय उलथापालथी राज्याने पाहिल्या, याचे दूरगामी परिणाम राज्याच्याच नाही तर देशाच्या राजकारणावर होऊ शकतात...

श्रीराम पवार
shriram.pawar@esakal.com

वर्षापूर्वी एकनाथ शिंदे यांचं शिवसेनेतून बंड विरोधी उठाव आणि भाजपप्रणीत सत्तास्थापना ही घटना राज्याच्या राजकारणात गाजली होती. केवळ एक सरकार जाणं दुसरं सत्तेवर येणं इतकाच हा परिणाम नव्हता. राज्यातील राजकीय प्रभावाच्या ठिकाणांवरही ती दूरगामी होती. या उलथापालथीच्या वर्षभराच्या काळात राज्यात अनेक उलथापालथी झाल्या आहेत. शिवसेना पक्ष आणि चिन्ह अधिकृतपणे शिंदे यांच्याकडं गेलं आहे. तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही सरकार कायम राहिलं, मात्र शिंदे गटाच्या आमदारांचं काय आणि पक्षांतर बंदी कायद्याचं काय हे प्रश्न संपलेले नाहीत. वर्ष संपताना एका जाहिरातीवरून पुढील तयार झालेला वाद ताजा आहे. राज्यात कायदा सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या मात्र ध्रुवीकरणाच्या राजकारणासाठी खाद्य पुरवणाऱ्या तणावाच्या, दंगलसदृश घटना वाढताहेत. पाच वर्षांत शरद पवार यांचं पक्षाध्यक्षपदाच्या राजीनाम्याचं नाट्य आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेतील पहिल्यांदाच फक्त आणि फक्तातील अन्य नेत्यांमध्ये आणखी एक नेतृत्वाचा स्तर तयार होतो आहे. त्याचे परिणाम असतीलच. 'मविआ' एकत्र लढली तर पुढील पाच फोडू शकते हे दिसलं असलं तरी अजून आघाडीतील पक्षांना स्वबळाची सुरसुरी अधूनमधून येतेच. पवारच युती आघाडीफोडीचे मोठे प्रवाह राजकारणात सक्रिय होताहेत. शिंदे - फडणवीस सरकारचं सरतेशेवट वर्ष महाराष्ट्रात असं गाजली फाटाफोडीचं होतं. त्यातून येणारं वर्ष राज्याच्या राजकारणाची दिशा ठरविणाऱ्या उलथापालथींचं असेल याचे संकेत मिळताहेत.

राजकारण नव्या वळणावर

महाराष्ट्रातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला एक वर्ष पूर्ण होत असताना राज्यातील राजकीय वातावरण तापलेलं आहे आणि ते तसंच राहील याची खात्री रोज वाटावी आणि विरोधकांतील खेळखंडोबा देत आहेत. राज्यातील सत्ताबदल हा विधानसभा अध्यक्षांची सर्वोच्च उपाधिकारी असलेली सभागृहातील संख्याबळ उपयोगात आणून घेतलेला निर्णय होता. राजकारणाला पक्का देणारी एक आघाडी सत्तेतून घालवून तिलाच पक्कं करणारा प्रयोग म्हणून हे सरकार अधिक दखलपात्र ठरतं. अधिक संख्याबळ असूनही मुख्यमंत्रिपद शिंदे यांना दिलं जाणं चुकवू शकणारं होतं. मात्र तोही भाजपच्या शिवसेनेच्या सक्तिसाठ केल्याखेरीज आपला राज्यातील निर्णायक प्रभाव सिद्ध होत नाही या दीर्घकालीन खेळाची सुरुवात होतं. आता ती शिवसेना फोडण्याची आणि पक्षच आमचा म्हणण्याची लवलाई संपते आहे, त्यासाठी हा अट्टहास 'महाशक्ती'नं केला त्यातलं खरंच काही हाती लागतं का असा व्यवहाराचा राज्यातील राजकारण आहे. तेव्हा आपलं राजकारण पलटायी आहे हे दाखवण्यासाठी झटझटून कामाला लागण्याची ही सरकारसाठी वेळ आहे. सर्व कसोटी आहे ती येणाऱ्या त्रिवर्षपूर्तीला छाप पाडण्याची. ठाकरे सरकार पाडलं योग्य होतं का? नवं सरकार गतिमान आहे का? याचा फैसला अखेर जनता येईल आणि शिवसेना हिंदुत्वाच्या मतपेढीतील फाटेकरी कमी करण्याचा भाजपच्या चालीचं काय झालं हे समजेल. तोवर एकमेकांच्या परिवारापर्यंत पोचलेली पातळीहीन शब्दकळा सहन करणं एवढंच महाराष्ट्राच्या हाती आहे.

दीर्घकालीन समीकरणांना हादरा

कोणत्याही सरकारनं एक वर्ष पूर्ण करावं, समर्थकांनी असं वर्ष पाचपूर्ती करावी असंच असतं असा आनंद साजरा आणि विरोधकांनी इतका अंधकार कधी होता? असं विचारायं ही रूढी बनते आहे. तेव्हा या प्रतिक्रियांतून सरकारचं वर्ष चाललं आहे का, हे समजणं सोपं नाही. मागच्या विधानसभा निवडणुकीने दिलेला कौल आणि त्यावेळचं शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाच्या भाजपशी युती तोडण्याचा घेतलेला निर्णय हा राज्याची राजकीय समीकरणं बदलणारा होता. तीनचं एक सर्वमान्यरूप मजबूत तयार झाली होती. त्यात एका बाजूला दोन्ही काँग्रेस दुसरीकडं शिवसेना आणि भाजप हे रूढ समीकरण होतं. दोन्ही बाजूंना त्याबाहेरच्या पटकू पक्षांमध्ये ताण होते. युतीत घोरल्या-पाकट्यांचं भांडणं होतं तर आघाडीमधील

दुरंगीऐवजी आणखीच सरकारची त्रिमिती आणि पुन्हा सलेत येण्याच्या शक्यता या दोन्हीला चूड लावणाऱ्या आहेत हे दिसत असूनही तो मोठा आवाज जाणारा. याच त्रिपक्षीयतेतून शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी साकारली हा भाजपच्या महाराष्ट्रातील दीर्घकालीन समीकरणांना मोठाच हादरा होता. तोवर भाजप महाराष्ट्रात सर्वांत मोठा पक्ष बनवण्या होता आणि

कोणत्याही आधारांशिवा सलेकडं जाण्याची वाटण्यात कक लागला होता. 'मविआ'नं पण मोठाच अडथळा आणला. राज्यात शत प्रतिशत भाटचाल करायची तर हिंदुत्वाच्या मतपेढीतले फाटेकरी संपवणं भाजपसाठी आवश्यक होतं. त्या राजकारणातून शिवसेनेचाच सलेपर येणारा भलताच परिणाम झाला होता. तो सुफल करायची संधी म्हणून शिवसेनेतून शिंदे गटाची फूट आणि या गटाला मूळ शिवसेना ठरवण्याच्या हालचालींना भागलवं बळ दिलं.

जाहिरातीच्या आडून कुरबुरी

या पडझडीतूनही भाजपला सत्ता मिळाली याचं पक्षाच्या दीर्घकालीन चाटचालीत मले प्रसही तयार झाले आहेत. ते स्वाभाविकपणे महाराष्ट्राच्या राजकीय चाटचालीशी जोडलेले असल्याचं तथ्योपी आहेत. एकटर राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून राज्यात चौरंगी सामना होत राहिला. यात आता शिंदे यांच्या शिवसेनेच्या रूपानं पाचवा बिंदू गिळात आला आहे. शिंदे गटानं तांत्रिक लढाईत शिवसेना आणि पक्षचिन्हं मिळवलं असलं तरी शिवसेनेला मानणारा मतदार किती प्रमाणात शिंदेकडं जातोय, किती प्रमाणात उद्धव यांच्या पक्षाकडं राहणार हे ठरायचं आहे. मतदेखील वर्षाअंतरही हे कोडं सुटलेलं नाही. शिंदे मूळ शिवसेनेच्या मतदारला किती साद घालणार आणि त्या बालेकिल्ल्या मतदारांवर त्यांची कार्यशैली किती प्रभाव टाकणार यावर राज्याच्या निवडणुकीकडं त्रिपाठेल्या राजकारणात बरंचसं भवितव्य अवलंबून आहे. तसंच पुढीलमधील उपयुक्तता आणि महत्त्व त्यावर ठरणार आहे. सरकार स्थापन झालयानंतर मंत्रिमंडळाचा सभासंख्या झालेले १८ जण वगळता या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला या अन्य सत्तास्थानांचं वाटप झालं. मुतीतील तरीही शिंदे यांच्या कोणत्या हितसंबंधाचं शिलेल्या जाहिरातीच्या निमित्तानं समोर आला होता. 'देशात मोदी, राज्यात देवेंद्र' या भाजपमधील चालेलाच 'राष्ट्रमध्ये मोदी, महाराष्ट्रामध्ये शिंदे' असते 'पंचाताईत' चाचलन चलवा दिला गेला होता. हे

निवडणुकांचे आव्हान

शिंदे - फडणवीस सरकारपुढं राजकीय पेचं आव्हान आहे ते येणाऱ्या वर्षातील निवडणुकांचं. येणारं वर्ष निवडणुकांचं आहे. आधी लोकसभा पाठोपाठ विधानसभा निवडणुकीला सरकारला सामोरं जावं लागेल. त्यासाठी त्यांनर महापालिकेच्या निवडणुकांत सरकारमधील दोन्ही पक्षांच्या ताकदीचा अंदाज येऊ शकतो. मात्र या निवडणुका सलग पुढचं जात राहिल्या आहेत. स्थलन्या काळात झालेल्या काही निवडणुकांतून 'मविआ' एकत्रितानं लढली तर युतीसमोर मोठं आव्हान उभी करू शकते हे दिसतं आहे.

ध्रुवीकरणाची व्यूहरचना

शिंदे यांनी शिवसेनेबाहेर पडताना हिंदुत्व हा मुद्दा चलवला होता. तेव्हाच पुढचं राजकारण या मुद्द्यांवर तापवलं जाईल हे दिसत होतं. भाजपला उद्धव यांनी हिंदुत्वारा लढाईत खेचलयाचं दाखवायचं आहे याचं कारण उद्धव यांच्या शिवसेनेचा मतदार हा भाजपसाठी सिलाताहेत अडथळा आहे. तूर्त तो शिंदे यांच्या शिवसेनेकडं गेला तरी भाजपचं काम भागतं. आता येणाऱ्या निवडणुकांत ५१ टक्के मतं मिळवण्याचं ध्येय भाजपचं ठेवलं आहे. महाराष्ट्रात असं घडलयं हे भाजपाकारपेक्षा कमी लोकांत. याचं कारण राज्याचं

उद्योगांत महाराष्ट्र कुठे?

सरकारच्या वर्षपूर्तीपेक्षी सरकारनं केलेल्या घोषणांची जंत्री जाहीर होईल. या सरकारनं मागच्या उद्धव ठाकरे सरकारचे अनेक निर्णय फिरवले. 'आरे'च्या कारशेडचा प्रश्न असो की बुलेट ट्रेनला चालना देण्याचा हा धागा दिसेल. जलयुक्त शिवार योजनेचं पुनरुज्जीवनही झालं आहे. महाराष्ट्र हे कायमच देशातील आघाडीचं राज्य राहिलं आहे. परंतु आणि देवी गुंतवणूकदारांची पसंती राज्याला नेहमीच चिकट आली आहे. सध्याचं सरकार पुन्हा एकदा राज्य आर्थिक आघाडीवर नंबर वन बनवलयाचं सांगत आहे. पण याचं सरकारच्या काळात फॉक्सकॉन, एअरबससारखे उद्योग राज्याबाहेर गेले अगदी पंतप्रधानांच्या तळ्या ड्रीम्स सेमीकंडक्टर चिप उद्योगासाठी जो करार झाला, तो उद्योगही गुजरातमध्ये साकारणार आहे. उद्योगातील तंत्रज्ञानाच्या नव्या लाटेत महाराष्ट्र चूकतं? हा प्रश्न यातून समोर येतो. त्यासाठी धोरणं आणि अंमलबजावणी हे सरकारपुढंच आव्हान असेल. आर्थिक आघाडीवर आता राज्याला गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू सारखी राज्य स्पर्धा करताहेत. त्यात राज्याचं अव्वल स्थान कायम ठेवणं हे सरकारी धोरणांवरच ठरणार आहे. समृद्धी महामार्गापासून मुंबई आणि राज्यातील अनेक भागात सुरू असलेली चालमूल सुविधांची कामं आणि कल्याणकारी योजनांचा वर्षाव सुरू आहे.

राज्यातील राजकीय आकड्यात पाच पक्षांत विभागलं गेलं आहे. शिवं ५१ टक्के मतं म्हणजे सर्वांना वर्चस्व, जे मागच्या अकडयात तीन दशकांत कोणत्याच पक्षात साध्यलेलं नाही, तेव्हा किमान युतीला तरी तेवढं यश मिळेल का, हा मुद्दा असेल. तिथं शिंदे यांना सोबत घेतलयाचं फेसका स्वरूप काय याचं पैमाना होणार आहे. तो म्हणजे मराठी हिंदुत्व हाच प्रमुख मुद्दा बनवला जाईल याची चुकचुक दिसते आहे. ती भाजपच्या राष्ट्रीय राजकारणाचा दिसतो, तशीच राज्यातील राजकारणातही. अन्यथा 'औरंगाबाचा औताबाद' हा महाराष्ट्रचा राजकीय चर्चेचा विषय काय व्हाचा? आतीकडच्या काळातील तणाव, इतिहासाचं सोयीनं उत्खनन हे मतं झाल्या त्या दृष्टीनं मतांचं ध्रुवीकरण करण्याच्या स्ट्रॅटर्जीचा भाग आहे. एका बाजूला मराठा मतांचं कण्सॉलिडेशन व्हावं यासाठी जरांगे पाटील विशेष कोशिश करताहेत. त्यातून मराठा समाजातील ओबीसी मतं स्वतःकडं वळवण्याचा प्रयत्न होतील. दुसरीकडं मराठ्यांचं कोण अधिक हिंदुत्ववादी याची स्पर्धा लागल्याशिवाही मिळणं कठीण दिसतं आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचे वारसदार आपणच हे सांगण्याचा सरकारमधील दुतीचा प्रयत्न याचा राजकीयचा भाग आहे.

जनाधाराची लढाई

हिंदुत्वाच्या या जोरा पक्षाही 'मविआ'तील तीन पक्ष एकत्र लढल्यास भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेसाठी राजकीय लढाई सोपी नाही हे स्पष्ट आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील आकडयाला वेगळं राजकीय वैशिष्ट्य लाभलेलंही आहे. विधानसभा होईपर्यंत आपापल्या गणगोत खासदार झालयाली जोडत राहतील मतदार विरोधकांची ताकद कमी करण्याचा प्रयत्न होईल असं दिसतं आहे. मविआ आणि युती असा थेट सामना लोकसभा आणि विधानसभेला झाला तरीही अनेक ठिकाणी निकालावर परिणाम करणारे अन्य सक्रिय होतील. तेलंगणातून 'बीआरएस'चे प्रमुख केसीआर साताऱ्यात महाराष्ट्रात येत आहेत. हा त्यातील एक ढळक पटक. त्यांचा पक्ष राज्यात काही घागात तरी प्रभाव दाखवण्या प्रयत्न करेल. आर्थिक सामाजिक आघाडयावरची विभागणी राज्यात बऱ्यापैकी स्पष्ट आहे. यात ज्या घटकांतून कमी पाठिंबा त्यातून जयपार अधिकाधिक विस्तारित राहाण्या याचाठीची रचना साकारण्ये प्रयत्न अजून जोर धरतील. या वर्षाचि परिणाम युती विरुद्ध आघाडी या दुरंग विभागणीत होईल, या समीकरणा महत्त्वाचा मुद्दा ठरतो तो शिंदे गटाचा जयापार किती? भाजपचा आधार पार बदलताना दिसत नाही. त्यात शिंदे गटाची बेटिंग ही ५१ टक्के राहुया चिन्ह 'मविआ'ला मातं टाकणारी ठरणार काय, हा २०२४ साठी कळीचा प्रश्न आहे, पण सत्तेचं पत्त्यातून फायदातं जाणारं सरकार आणि आपलं जनतेच्या दारात जाणारं सरकार हे प्रतिमेचं व्यवस्थापन किती परिणामकारक ठरतं हे पहायचं!

पान १ वरून...

शिवसेना शिंदे गटाने फाट्यातोड म्हणून आमदार श्री. भरत गोगावले यांची केलेली निवड आणि विधानसभा अध्यक्षांनी त्यावर दिलेली मान्यताही सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटाला दिलेली मान्यता आणि पक्षचिन्हासंदर्भातील आदेश पूर्वलक्षीप्रभावाने लागू होणार नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले आहे. शिवसेना शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर विधानसभा अध्यक्षांनी योग्य वेळेत निर्णय घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे आवलोकन केले तर, महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकार हे बेकायदा सरकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सूचित केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने लोकशाही मर्यादांचे पालन करत केंद्रीय निवडणूक आयोग आणि विधीमंडळाच्या अधिकारात हस्तक्षेप करणे टाळले आहे. केवळ त्यामुळेच सरकार वाचलं. विधानसभा अध्यक्षांकडून शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रोकबाबत निर्णय त्वरित होणे अपेक्षित आहे. तो निर्णय विरुद्धपणे झाल्यास शिंदे सरकारच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकेल.

महाराष्ट्राची संस्कृती जपावी

महाराष्ट्र राज्याच्या हीरकमहोत्सवी वाटचालीत कृषी, उद्योग, व्यापार, शिक्षण, सहकार, आरोग्य, साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती, आर्थिक व सामाजिक सुधारणा अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र देशातील आघाडीचे राज्य आहे. सर्व जाती, धर्म, पंथ, प्रांत, भाषांच्या नागरिकांना सोबत घेऊन महाराष्ट्राने विकासाच्या वाटेवरील घोडदौड कायम राखली आहे. राजकीय, सामाजिक सुसंस्कृतपणा महाराष्ट्राने कायम जपला आहे. गेल्या वर्षभरात शिंदे सरकारमधील मंत्री, सत्ताधारी आमदारांनी वेरेतेले वर्तन आणि त्यांची वक्तव्ये महाराष्ट्राच्या सुसंस्कृतपणाला धक्का देणारी आणि चिंतेत टाकणारी आहेत.

शेती आणि शेतकरी महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कोरोनाच्या जागतिक संकटात राज्याची, देशाची अर्थव्यवस्था सक्षमपणाचे काम कृषीक्षेत्राने केले. परंतु, शिंदे सरकारच्या काळात राज्यात शेतकरी आत्महत्या झाला आहे. अलकाळी पाऊस आणि गारपिटीने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला सावरण्यासाठी राज्याला अद्याप पुरेसाही जाहीर करण्याची मागणी तसेच हेक्टरी ७५ हजार आणि फळपिकांना हेक्टरी दीड लाख रुपये मदतीची मागणी आम्ही

निर्णयक्षमतेचा अभाव

केली होती, परंतु ती मान्य केली नाही. अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मदत शेतपंचनामे मिळालेले नाही. उलट खतं, बियाणे, कीटकनाशके, कृषी साहित्याच्या दरात वाढ झाली. कृषी साहित्यावर 'जीएसटी' लागण्यात आला. आज शेतमालला भाव नाही, कापूस शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. कांदा, टोमॅटो, भाजीपाला रस्त्यावर फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. कांदा, सोयाबीन, केळी, संत्री, आंबा आणि दूध उत्पादक शेतकरी संकटात आहे. शेतकऱ्यांना पीककर्ज, पीकविम्याची मदत मिळालेली नाही. शिंदे सरकारच्या वर्षभराच्या काळात दररोज सरासरी आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत.

अतवृष्टीमुळे शेतकरी होरपळला असताना शेतकरी कुटुंबे मदतीपासून वंचित आहेत. शेतकरी आत्महत्याग्रस्त महाराष्ट्र करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा हवेत विरली आहे.

औद्योगिक पातळीवर निराशा

शिंदे सरकारच्या कार्यशैलीबाबत बोलायचे तर सर्वच आघाड्यांवर काळाकुट्ट अंधार दिसतो. शिंदे सरकार सत्तेवर आल्यानंतर राज्यात येणारे अनेक मोठे उद्योग अचानक राज्याबाहेर गेले. थांबले सुरू असलेले उद्योग बंद पडले. व्यापार थंडावला. वेदर शासकीय, निमशासकीय संस्था, औद्योगिक संस्थांची कार्यालये राज्याबाहेर गेली. परकीय गुंतवणूक आटली. महागाई, बेरोजगारी वाढली. महाविकास आघाडी सरकारने पोतलेल्या विकासकामांना स्थगिती दिली. त्यामुळे जनतेचे नुकसान झाले. राज्याचा विकास खुंटला. महाराष्ट्राच्या हिताच्या अनेक निर्णय शिंदे सरकारच्या काळात घेतले गेले. महाराष्ट्र हिताचे संरक्षण करण्यास शिंदे सरकार सपशेल अपयशी ठरले.

चेहरे झळकावण्यासाठी जाहिराती

शिंदे सरकारने गेल्या वर्षभरात जर काही केले असेल तर, मुख्यमंत्र्यांचा स्वतःचा दाढीदार चेहरा झळकलयाच्या जाहिरातींवर कोटयवधी रुपयांची उधळपट्टी केली. जाहिरात करताना शासकीय योजनांची माहिती देण्यापेक्षा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे चेहरे झळकलण्यासाठी हा जनतेच्या कष्टाच्या कोटयवधींचा निधी उधळण्यात आला.

राज्यातल्या आणाडीच्या वर्षपूर्तीनिमित्तांच्या पहिल्या पानावर, मुख्यमंत्री शिंदे यांची लोकप्रियता २६.१ टक्के आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लोकप्रियता २३.२ टक्के असल्याच्या जाहिराती तुफरचाच प्रसिद्ध करण्यात आल्या. मुख्यमंत्री शिंदे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षा अधिक लोकप्रिय दाखवल्याने खूप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उघड नाराजी व्यक्त केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी नवी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. इतक्या मोठ्या प्रमाणात कोट्यवधींच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी पैसा कुठून येतो, हा राज्यातील जनतेला पडलेला प्रश्न आहे.

शिंदे सरकारच्या काळात सर्व क्षेत्रांत भ्रष्टाचार प्रचंड वाढला. सरकारमधील मंत्री आणि त्यांच्या 'पीएं'चा भ्रष्टाचार हा गंभीर मुद्दा बनला आहे. मंत्री संदीपान भुमरे, अब्दुल सत्तार, संजय राठोड, मुनगंटीवार, तानाजी सावंत यांच्यासह अनेक मंत्री, पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप आहेत. मंत्र्यांचे पीए उद्योजक आणि व्यापाऱ्यांवर बेकायदा दबाव पाकत आहेत. मंत्र्यांनी अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये मोठी वसुली सुरू केली आहे. अधिकारी बदल्यांचे रेटकार्डच प्रसिद्ध झाले आहे. महसूल विभागातल्या बदल्यांवर स्थगिती देऊन 'मॅट'ने बदल्यातील भ्रष्टाचारावर शिक्कामोर्तब केले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या मागणेश आणि पुस्तक खरेदीतही मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाला आहे. एकूण सध्याचे सरकार हे भ्रष्टाचाराच्या चिखलात पाठाळ रिपाळेले सरकार आहे.

एकीकडे जाहिरातींवर बारेमाप उधळपट्टी सुरू आहे तर दुसरीकडे सरकारकडे विकासकामांसाठी निधी नाही. राज्याच्या तिजोरीत मात्र खडखडाट असल्याची परिस्थिती आहे. गेल्या आर्थिक वर्षातील सुमारे एक लाख ६ हजार कोटींची विरो दीर्घकाळ प्रलंबित ठेकेदारात आली. कोरोनाच्या संकटकाळात सर्व व्यवहार बंद असताना राज्याची आर्थिक घडी विस्कटणार नाही, याची काळजी आम्ही घेतली होती. परंतु सध्याच्या सरकारकडे ती बाधिलकी दिसत नाही, हे दुर्दैव आहे.

मूठभरांच्या हाती राज्य

राज्यातील जनता असल्या पाठीशी नाही. महाराष्ट्रातील जनमानस अजूनपाविरुद्ध आहे. आपले सरकार औट घटकेचे सरकार आहे. हे सरकार पुन्हा निवडून येण्याची शक्यता नाही, याची जाणीव खुद मुख्यमंत्री महोदयांनाही झाली असावी. विविध संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून शिंदे-फडणवीस सरकारला मोठा पटका बसताना दिसेल, हाच निष्कर्ष समोर आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. येते वर्षभर राज्याची सत्ता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि त्यांचे प्रत्येकी पाच मंत्री यांच्या हातात एकवटली आहे. या मंत्र्यांकडे शासनेपेक्षा जास्त खाती, पालकमंत्री म्हणून जास्त जिल्हे आहेत. हे मंत्री त्यांच्या पदाला, खात्याला न्याय देऊ शकत नाहीत. यामुळे जनतेची कामे थांबली आहेत. राज्याचा विकास खुंटला आहे.

आज राज्यातील जनतेचे तीन मूलभूत प्रश्न, महागाई, बेरोजगारी, विकासाच्या मुद्द्यांवर ठोस कार्यक्रमाचा प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या मुद्द्यांवरही शहरांची नावे बदलणे, धार्मिक मुद्दे उपस्थित करून समाजात तेढ निर्माण करणे, चिखलटाकून राजकारण करणे, राज्यात अशांतता निर्माण करून गतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न काही शक्तींकडून सुरू असल्याचे दिसते. त्यास सरकारकडून अभय दिले जाणे हे राज्याच्या हिताचे नाही.

महिलांसाठी असुरक्षित वातावरण

राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. ठाणे अधिकारी आणि गुंडांना संरक्षण दिले जात आहे. ठाणे जिल्ह्यात सलगच भाजपकडून मुख्यमंत्र्यांवर गंभीर आरोप केले गेले आहेत. ठाण्यात शंभरहून अधिक जणांना पोलिस संरक्षण दिले जात असताना राज्यातील गरीब-मध्यमी माय असुरक्षित आहेत. पुण्यात भरदिवसा तरुणीवर कोयत्याने हल्ला झाला. एमपीएससी उत्तीर्ण तरुणीची हत्या करण्यात आली. मुंबईत वसतिगृहात राहणाऱ्या तरुणीवर सुशा रुमाने अत्याचार करून हत्या केली. मुंबईत लोकलमध्ये महिलेवर हल्ला करण्यात आला. बीडमध्ये येथे एका नराधमाने सोबत राहणाऱ्या तरुणीची धरात हत्या करून तिच्या मृतदेहाचे तुकडे कुकरमध्ये शिजवले. महिलांवरील हल्ले, अत्याचार, महिलांबाबत विरुद्धकाराची भावना हा गंभीर सामाजिक प्रश्न आहे. परंतु, सरकार याबाबत गांभीर्याने बघण्यास तयार नाही. सहारातून, जिल्ह्यातून तरुण मुलींचे गायब होण्याचे प्रमाण हा देखील चिंतेचा विषय आहे. शिंदे सरकारचं याबाबतं संपूर्ण दुर्लक्ष आहे. गेल्या सहा महिन्यात तब्बल दीड हजार २०० मुली राज्यातून गायब झाल्या आहेत. या मुली कुठे गेल्या, त्यांचे पुढे नक्की काय झाले हे शोधण्यात शिंदे सरकार अपयशी ठरले आहे, हे त्यांचे सर्वांत मोठे अपयश आहे.

सकाळ

शिंदेशाहीची वर्षपूर्ती

शिंदे-फडणवीस सरकारच्या गेल्या वर्षभरात आरोग्य, कायदा- सुव्यवस्था, उद्योग आणि गुंतवणूक, कृषी, सांस्कृतिक, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील, घोरणांचा घेतलेल्या निर्णयांचा आणि सरकारच्या कामाचा तज्ज्ञांनी घेतलेला आढावा.

वर्षभरातील निर्णय

शेती

'सततचा पाऊस' ही नैसर्गिक आपत्ती घोषित. शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मदतीचा निर्णय.

आतापर्यंत सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी **७५५ कोटी ६९ लाख** रुपये निधी वितरित

सोयाबीनवर शंखी गोगलगायमुळे ५ जिल्ह्यात ०.७३ लाख हे.क्षेत्र बाधित. ९८.५८ कोटी इतका निधी.

नुकसानग्रस्त कांदा उत्पादकांसाठी ३५० रुपये प्रती क्विंटल अर्थसहाय्य

शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये वेट मतदान करता येणार.

राज्यात काजू फळपिक विकास योजना लागू होणार. काजू बोर्डासाठी २०० कोटी रुपये

पाच हजार गावांत जलयुक्त शिवार अभियान पुन्हा सुरु.

भूविकास बँकेच्या कर्जदार ३४,७८८ शेतकऱ्यांना **१६४ कोटी १५ लाख** रुपयांची कर्जमाफी. सुमारे ६९ हजार हेक्टर शेतजमिनीवरील भूविकास बँकांच्या कर्जाचा बोजा कमी

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रकमेत. **१२.८४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४६८३ कोटी** रुपये वाटप

गेल्या हंगामात सुमारे २०० साखर कारखान्यांनी गाळप घेतले असून शेतकऱ्यांना ४२ हजार ६५० कोटी रुपयांची एफआरपी (रास्त व किफायतशीर भाव) अदा.

शेतीला दिवसा वीजपुरवठ्यासाठी ३ वर्षांत ३० टक्के कृषी वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण. ९.५० लाख शेतकऱ्यांना लाभ

प्रलंबित ८६ हजार ७३ कृषीपंप अर्जदारांना तत्काळ वीजजोडणी

गोरसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पास यावर्षी १५०० कोटी, जून २०२४ पर्यंत प्रकल्प पूर्ण करणार

नाशिक जिल्ह्यातील ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या १ हजार ४९८ कोटी ६१ लाख खर्चास चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता. नाशिक, अहमदनगर,औरंगाबाद जिल्ह्यातील ७४ हजार २१० हेक्टर सिंचन क्षेत्रास याचा लाभ.

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतून धाराशिव, बीड जिल्ह्यांतील १३३ गावांना सिंचन लाभ. ११६.२६ कोटी रुपये सुधारित मान्यता

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता केवळ **१ रुपयांत पीकविमा. ३३१२ कोटी** रुपये सरकार भरणार

मागेल त्याला शेततळे योजनेचा आता व्यापक विस्तार. १००० कोटी रुपये खर्च करणार

गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सलगसलगच्या, लागोपाठ २ लाखांपर्यंत.

आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त 'श्रीअन्न अभियान. २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद

नागपुरात कृषी सुविधा केंद्र,विदर्भात संजापक्रिया केंद्र

एक लाख ३७ हजार ७९९ लाभार्थींना **८२४ कोटींहून** अधिक अनुदान कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या माध्यमातून

नागपुरात डी. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र करणार

२०० कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान' सुरू

हिंगोली जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापणार

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात शेतकऱ्यांना १२ कोटींहून अधिक अनुदान वेट खात्यावर

प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसानभरपाईसाठी धोरण सांबाकिनारे महाराष्ट्र पहिले राज्य, मच्छीमार कुटुंबांसाठी **५० कोटींचा मत्स्यविकास कोष**

मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी नोकेल्या १२० अश्वशक्तीची अट काढली, मच्छीमारांना लाभ

देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन, संरक्षणासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना

विदर्भ, मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांना दुग्ध विकासाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १६० कोटी तरतूद.

लम्पी चर्मरोगामुळे मृत १८ हजार ४३२ पशुधनासाठी सुमारे ४६ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य. पशुपालकांना अर्थसाहाय्य देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य

औरंगजेब पुन्हा जिवंत झालाय...

कायदा सुव्यवस्था

रविकिरण देशमुख
राजकीय विश्लेषक

गेल्या वर्षी जून महिन्यात उद्धव ठाकरे सरकारची उलटगणती सुरू झाली होती, त्यापेक्षाही राजकीय वर्तुळात एकच चर्चा घेऊन्यानी होती, एवढे मोठे विधिमंडळ उद्धव मंत्र्यांसह राज्यकर्ते जात असताना याची माहिती गुप्तचरांनी आणि गृहमंत्री यांना कशी नव्हती? सूरतच्या दिशेने जाणाऱ्या विधिमंडळ सदस्य व मंत्र्यांच्या 'बसी' घर परत आणा, असा आदेश शिल्लकसेनी ही गाड्ये घेऊन कशी गेली, या चर्चांना ऐत आत्मसूचक पोलिस विभागाकडे होता.

ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे (मविआ) सरकार जाऊन एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना बंडखोर गट व भाजप यांचे सरकार सत्तेवर येत असताना आणि आता हे सरकार वर्षपूर्ती करत असताना कायदा-सुव्यवस्था आणि पोलिसांची कार्यपद्धती हे विषय राजकारण आणि समाजकारणाच्या केंद्रस्थानीच आहेत. हे वातावरण गेले वर्षभर या न त्या कारणाने धुमसताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात किमान आठेक ठिकाणी चिंताजनक परिस्थिती पोलिसांना हाताळावी लागलेली आहे. यात विशेष ठरते आहे ते औरंगझेबाचे उदात्तीकरण! औरंगजेबाबरोबरच काही अनाजक खान खल काही दिवू सुलतान विशेष ठरले आहे. ''अचानक औरंग्याच्या एवढ्या औलादी कुठून पैदा झाल्या?'' हे गूढ खालच्या कारभार सांभाळणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानही लेखकाच जोराचा धुमाकूळ आहे. त्याचे प्रतिध्वनी विविध स्तरांवर उमटताना दिसत आहेत.

राज्यात दोन स्वतंत्र पोलिस कमजात सुरू असल्याचे दिसते आहे. एक राजकीय स्तराचा आणि दुसरी सामाजिक स्तराचा. हिंदू आक्रोश मोर्चे, औरंगजेब उदात्तीकरणाच्या अनुषंगाने प्रतिक्रिया, ठाकरे गटाचे अधिकृत-अनधिकृत हे वाद सत्तांतर दिसत असताना सत्तेच्या खालीपातळ्यांवर विशेष चौकशी पथक (एसआयटी), इतर चौकशा सुरू आहेत. केंद्रीय तपास यंत्रणांबरोबरच राज्य पोलिस दलालाही विशेष जबाबदारी पार पाडावी लागत आहे. ठाकरे यांचे काही निकटवर्तीय चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची शक्यता मुंबईतील राजकीय वातावरण तापलेले आहे. मुंबईतील घटनांचे पडसाद राज्यभरात उमटत असतात. याचा अंदाज तात्काळ प्रतिक्रिया पहाता शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी काढला जाणारा मोर्चा कसा विषेत आणि त्यातून काय हा सुवर्णमध्येचा प्रश्न निर्माण होणार नाही ना, तसेच उद्धव ठाकरे यांचे निरीक्षण आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात कसा प्रतिसाद मिळेल, याकडे लक्ष असणार आहे.

राजकीय वातावरण तंगच

एक जुलै रोजी शिवसेनेतील (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) बृहन्मुंबई महापालिकेवर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा मार्ग कोणता असावा, याबाबी ठाकरे गट मुंबई पोलिसांशी चर्चा करत आहे. त्याआधी या शिवसेनेची एक शाखा अनधिकृत आहे, असे सांगत महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून ती तोडण्यात आल्यानंतर एका अभियंत्यावर हल्ला झाला. राजकीय वातावरणाबरोबरच कायदा व सुव्यवस्थेचे वातावरणही तप्त आहे.

उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अग्रेसर

उद्योग आणि गुंतवणूक

डॉ. मिलिंद कांबळे
संस्थापक, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंड.

महाराष्ट्र हा देशात विविध क्षेत्रांत कायमच अग्रेसर राहिला आहे. राज्यातील उद्योग क्षेत्राबाबत बोलायचे झाल्यास सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगात महाराष्ट्राने बाजी मारली आहे. सध्या राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील वाढत्यागोदरी एक नवा इतिहास निर्माण केला आहे असेच म्हटले पाहिजे. स्टार्टअप व इनोवेशन या क्षेत्रात महाराष्ट्र राज्याने आघाडी घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. नवनवे संकल्पना आणि उद्योगपुरक वातावरणात कार्यान्वयता चालना देण्याच्या दृष्टीने सरकारतर्फे घेतले उपक्रमही जात आहेत.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला 'ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्था' करण्यिण्यासाठी महाराष्ट्र राज्याने नवे माहिती आणि तंत्रज्ञान धोरण जाहीर केले आहे. या नव्या धोरणाचा नवीन विद्युतील लघुउद्योजकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. या धोरणाचा उद्योजकांनी पक्कपीच लाभ करून घेतला पाहिजे. या धोरणामुळे राज्यात सुमारे ९५ हजार कोटींची नवीन गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. या धोरणाच्या आधारे साडे तीन लाख रोजगार निर्माण होऊ शकतात. स्वयंरोजगाराचे या धोरणातून सुमारे दहा लाख कोटी नियोजीचे लक्ष्य देखील सरकारने ठेवले आहे.

राज्यांस चेर्बाल सामंजस्य करार

दावोस येथे २०२३ मध्ये झालेल्या जागतिक गुंतवणूक परिषदेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने १८ हून अधिक कंपन्यांशी सुमारे एक लाख ३० हजार कोटींहून अधिक रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत, या करारांची अंमलबजावणी झाल्यास राज्यात जवळपास एक लाख ते दीड लाख लोकांसाठी नवीन रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे राज्य सरकार, औद्योगिक धोरणाबाबत नव-नवीन प्रयोग करत पहात आहे. मात्र, महाराष्ट्र सरकारच्या या नवीन धोरणाचा फायदा हा लघुउद्योजकांना होण्यासाठी सरकारने त्यांच्यापर्यंत पोहोचायला हवे, यासाठी सरकारने पुढाकार घेतल्यास महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात एक नवीन इतिहास घडवू शकतो.

सुमारे ४० हजार रोजगार निर्मितीची शक्यता

महाराष्ट्र राज्याने बजाज फिनसर्व्ह सोबत नुकताच पाच हजार कोटींच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार केला आहे. याद्वारे राज्यात सुमारे ४० हजार रोजगार निर्माण होण्याची आशा व्यक्त केली जात आहे. याव्यतिरिक्त अन्य काही करार करण्याचे उद्दिष्ट शासनाने समोर ठेवल्यास, महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन, महाराष्ट्रातील बेरोजगारी बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

कृषी क्षेत्राच्या कामगिरीचा घसरता आलेख

शेती

डॉ. सोमिनाथ घोळवे
शेती, दुष्काळ, पाणी प्रश्नांचे अभ्यासक, 'द युनिक फाउंडेशन, पुणे' येथे वरिष्ठ संशोधक

गेल्या वर्षभरातील कृषी क्षेत्रातील राज्य सरकारच्या कामगिरीचा विचार करता कृषी विषय हा राज्य सूचीतील असल्याने, कृषी क्षेत्रातील शाश्वत विकासाच्या बाबतीतही समस्या सोडविणे आणि रोजगार निर्मितीचे धोरणात्मक नियोजन करून राबवणे शक्य होते, मात्र ही संधी सरकारने घेतली नाही. कृषी क्षेत्रात पूर्वापार ज्या समस्या होत्या, त्या सोडविण्याची भूमिका न घेता तात्पुरता मलमपट्टी करून घोषणा करणे किंवा आश्वासने देण्यापलीकडे भूमिका घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे जुन्याच प्रश्नांची तीव्रता वाढली आहे. कृषी निविष्ठांचे वाढते दर, हवामानिक खते, संकरीत बियाणे, कीटकनाशके, मजुरी आदी सर्वांची दरवाढ होतच आहे. याबाबी पाहणे सरकार दिसे नाही, त्यामुळे शेतीतील गुंतवणुकीच्या तुलनेत नफ्याचा घटलेला मिळणे अशाश्वत झाले आहे. परिणामी घरातलं भागलं, बँकांचे पीककर्ज आणि खासगी सावकारांचे कर्ज परतफेड करणे अशाश्वत झाले आहे. एका कर्जाची परतफेड करण्यासाठी दुसरी दोन कर्जे काढण्यापलीकडे मराठवाड्यातील शेतकरी अडकून पडलेले आहेत. त्यामुळे अलीकडे हतबल शेतकरी-शेतमजूर वर्ग 'मायक्रो फायनान्स'च्या कर्जबाजारी जाळ्यात ओढला जाऊ शकतो आहे.

मुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना 'आत्महत्यामुक्त महाराष्ट्र' होईल, असा विश्वास जनतेला दिला होता, मात्र उद्दामपणाने वसल्याने शेतकरी आत्महत्या वाढतच आहेत. दुसरे म्हणजे वर्षभरात विविध जेंगल्यांच्या कवाढ विषाणे विजेमुळे शुकर-शिवार पेरणी, ऑगस्टमध्ये महिनाभर पावसाने खंड दिल्याने कोटवाडाचे परिसरात पिके करपणे, सोयाबीन पोगलगाय, मोठ्याक किडीचा, तांबेरा, लष्करी अळी, अतिवृष्टी, एम्बी हंगामातील नुकसान याद, मार्चपर्यंत अशा विविध संकटांमध्ये सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिल्याचे दिसून येत नाही. केवळ पंचनामे करण्याचे आणि मदतीचे आश्वासने मिळाले पण अंमलबजावणी नाही. जिरे म्हणजे मार्च २०२३ महिन्यात 'नवी शेतकरी सहाय्यता निधी योजने'ची घोषणा केली, मात्र अद्याप अंमलबजावणी नाही. चौथी बाब म्हणजे कांदा विक्रीत अनेक शेतकऱ्यांना उभे नाही असल्याने १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ दरम्यान विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ३५० रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले, खरिपाची पेरणी झाली तरीही एकाही शेतकऱ्याला हे अनुदान मिळाले नाही. पाचवा मुद्दा म्हणजे ग्रामीण भागातील प्रक्रिया उद्योगाचा विकास असणे, सक्षम साठवण आणि वाहतूक यंत्रणा नसणे, बाजारीत वाढ होणे, बाजीपाल्यासह वर्षभर भाव नसणे, धाटधान्य, तृणधान्य, भाग्या, कडधान्य, फळ उत्पादन आणि शेतकिया या कोणत्याही शेतमालाचे महागाईच्या तुलनेत भाव वाढते नाहीत. परिणामी शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात घसरण झाल्याचे दिसून येते. अशी कृषी क्षेत्राच्या समस्या-प्रश्नांची यादीच चालू आहे.

अनुदानाची अंमलबजावणी पण...

सरकारच्या बाजू म्हटले, तर आधीच्या सरकारने नियमित पीककर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजारांचे अनुदान देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी या सरकारने केली, मात्र हे अनुदान अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळाले असून बहुतांश अनुदान मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. सरसकटपणे, वर्षभरातील कृषी क्षेत्रात राज्य सरकारने केवळ घोषणा-आश्वासनांचा पाऊस पाडला, पण अंमलबजावणी नाही, असे चित्र झाले आहे.

'टिकमार्क' संस्कृतीच्या पल्याड जाण्याची गरज

सांस्कृतिक

भानू काळे
जेष्ठ लेखक-संपादक

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा प्रश्न सध्या ऐरणीवर येत आहे. शिंदे-फडणवीस सरकारनेही पूर्वीच्या सरकारप्रमाणेच 'हा प्रश्न अजूनही भिजत ठेवू,' 'दिल्लीकरांमुळे जाऊन आपली मागणी मांडू,' असे आश्वासन दिले. पण अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर जे काही भरीव निधी प्राप्त होण्याचा अंदाज आहे, त्याचा विनियोग करता कारणार, याचर चर्चा होणे महत्त्वाचे आहे.

मराठी ज्ञानभाषा कधी होईल, याबाबत सातत्याने चर्चा होत असते. शिंदे-फडणवीस सरकारने त्यासाठी 'मराठी विद्यापीठ' स्थापन करण्याची घोषणा केली आहे, पण १९४८ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना झाली, तीच मुळी मराठी भाषेच्या अभ्युदयासाठी. या स्थापनेला आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, पण आजपर्यंत विद्यापीठात कोणत्या विषयाचे पदव्युत्तर शिक्षण तुम्ही मराठी भाषेत घेऊ शकता? याचे उत्तर कोणापाच नाही, असे आहे. याचे कारण कोणत्याच विषयांची मराठी भाषेतील क्रमिक पुस्तकेच पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मिळणाऱ्या विशेष निधीचा विनियोग त्यासाठी कसा करणार, याची ठोस योजना सरकारकडे नाही. इतकेच काय, विद्यापीठातील मराठी विभागांमध्येही आज अशक्तपणे आहे. एम. ए. मराठी विद्यापीठ स्थापन करून काय साध्य होणार?

याच सरकारने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दोन कोटी रुपयांचे अनुदान दिले. तसेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्व साहित्य संमेलनाला दहा कोटी रुपयांची देणगी दिली आहे. सरकारने निधी उपलब्ध करून दिला, हे चांगलेच आहे. तथापि, सरकारने काम हे नागरिकांना अधिकाधिक सक्षमतेने करण्याचे आहे, त्यामुळे आयोजकांनी लोकसहभागातून जास्तीत जास्त निधी उभारावा, या दृष्टीने सरकारने प्रयत्न करायला हवेत. पण सरकारच्या कारभारात विश्वकोश निर्मिती मंडळ आणि साहित्य व संस्कृती मंडळ, या दोन महत्त्वाच्या संस्थांच्यामध्ये प्रमुखांची राजीनामा देण्याची घटना घडली. ही घटना अनुचितच होती. या राजीनाम्यांकडे मराठी भाषा संस्थांनी दोन्ही प्रमुखांची समजूत काढली आणि त्यांनी आपले राजीनामे मागे घेतले, हे ठीकच, परंतु, राजीनामा देण्यामागील मूळ कारणांचे निराकरण मात्र झाले नाही.

एकूणचाच, कोणत्याही शासकीय विभागाला दुर्ही काम केले असे विचारल्यावर 'आम्ही अमुक अमुक कोश तयार केले,' 'अमुक ग्रंथ ग्रंथांची निर्मिती केली,' अमुक स्पर्धांचा निधी जाहीर केला,' असेच यादी सादर केली जाते, प्रत्यक्षात यातील काय लोकांपर्यंत पोचले, हे महत्त्वाचे आहे. हे सरकारदेखील 'टिकमार्क संस्कृती'चाच कित्ता गिरवणार का? दीर्घकालीन दृष्टीसाठी योजनांमध्ये दुरदृष्टी, त्यांच्या अंमलबजावणीच्या अडचणी आणि फसलेल्या योजनांमागील कारणांचा अभ्यास सखोलपणे करणे गरजेचे आहे. अन्यथा, 'ग्रंथपुरुषा लखलखाटा'ऐवजी ग्रंथदिंडीचा हत्ती काही लागणार नाही.

समन्वय आणि सुसूत्रतेची गरज

ग्रंथालय आणि ग्रंथसंस्कृती हा भाषा आणि साहित्य यांच्या संदर्भातील महत्त्वाचा विषय आहे. राज्य सरकारचे ग्रंथालय संचालनालय हे उच्च आणि तंत्रशिक्षण खात्याच्या अंतर्गत काम करते. शिक्षण मराठी भाषा विभाग स्वतंत्र आहे. मराठीशी संबंधित सगळी समित्या व महामंडळे सांस्कृतिक खात्याच्या अखत्यारीत येतात. या सर्वांची कामे परस्परपूरक आहेत. त्यामुळे त्यांच्यात समन्वय आणि सुसूत्रता साधली जाणे, अवश्यक आहे. त्याचा आज अभाव जाणवतो.

आरोग्य सेवेतील आव्हाने पेलणार का?

आरोग्य

डॉ. अनंत फडके
संस्थापक, अन्नआरोग्य अभियान

महाराष्ट्रातील आरोग्य सेवेत फार मोठ्या सुधारणा करण्याची निकडीची गरज कित्येक वर्षे आहे, सुधारणा करण्याची मागणी जन आरोग्य अभियानाने अनेकवेळा केली आहे. सरकारी आरोग्य खर्चात प्रचंड वाढ, आरोग्य खात्यातील रिक्तपदे जागा भरणे, सरकारी केंद्रांसाठी औषध खरेदीत आमूलाग्र सुधारणा, खासगी रुग्णालयाचा दर्जा व त्यांचे दर यावर नियंत्रण या मुद्द्यांकडे शिंदे-फडणवीस सरकारने प्रत्यक्षात चरीत्र काही केले तरच योग्य दिशेने सुधारणा होतील, मुलभूत खासगीकरण व दिलखेचक आलेला आदेश फडणे ही दिशा सोडायला हवी.

वर नमूद केलेल्या धोरणात्मक सुधारणा करण्याची निकडीची गरज का आहे ते आपी थोडक्यात पाहू. सरकारी आरोग्य खर्च सरकारच्या एकूण खर्चाच्या आठ टक्के हवा.... इति नीती आयोग, पण महाराष्ट्र सरकारचा तो फक्त तीन टक्के आहे. या खर्चीबाबत हतबल डही सरकारपेक्षाही सर्व दोष म्हणजे केवळ शब्दांचे बुडबुडे आहेत.

राज्याचे आरोग्यावरील ही अत्यंत तुटपुंजी तरतूदही गेल्याकाही वर्षे सातत्य कमी प्रमाणात खर्च केली जात आहे. जिल्हे एकमही खर्च केले जात नाही. प्राथमिक पातळ सेवा पुरवण्याची जबाबदारी असलेल्या ग्रामीण ग्रामीण आरोग्य अधिकाऱ्यांसाठीच्या महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी केंद्र सरकार निधी देते. हे पैसे सुद्धा जवळ जवळ निम्मे पडून राहतात. महाराष्ट्राचे औषध खरेदी आणि पुरवठा धोरण अतिशय अकार्यक्षम पद्धतीने राबवले जात असल्याने रुग्णालयांना आवश्यक असलेला औषध पुरवठा वेळेवर होत नाही. दरम्यानदू सरकारचे जगप्रसिद्ध प्रकल्प या घाबत महाराष्ट्रात चालवले, अशी मागणी कित्येक वर्षे होत आहे. हे प्रकल्प अस्तित्वात येण्यात महाराष्ट्र सरकार जाहीर झाले आहे, पण रुग्णालयाच्या व्यवस्थेतील 'हितसंबंध संरक्षणाचे अस्तित्वाने त्याची अंमलबजावणी अजूनही हे झालेले नाही. परिणामी स्थानिक पातळीवर औषधांची महागड्या दराने खरेदी करणी लागत आहे किंवा रुग्णांना त्यांच्या खिशातून यासाठी खर्च करावा लागत आहे.

आरोग्य खात्यातील जागा फार मोठ्या प्रमाणावर रिक्तपदे आहेत, विशेषत:, ग्रामीण भागात तज्ज्ञ डॉक्टरांच्या. उदा. ग्रामीण रुग्णालयात अनेक ठिकाणी ८० टक्के जागा रिकाम्या आहेत. आरोग्यवरील या प्रचंड कमी खर्चाचे जाहीर स्पष्टीकरण देणे, यातला जबाबदार असणारे ग्रारेटील मुद्दाचर्चा कोण आहेत हे शोधून त्यांच्यावर कडक कारवाई करणे, ग्रामीण आणि शहरी भागात रुग्णांसाठी आवश्यक रोग, तपासीकरण, औषधे, आवश्यक साधने, उपचार व्यवस्था आदींसाठी आवश्यक यंत्रणेत सुधारणा करून त्यासाठीचा खर्च पूर्ण क्षमतेने करणे, राज्यातील लोकांच्या आरोग्य गरजा पूर्ण करणे तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचे पगार, थकबाकी आदींचा अनुशेष तातडीने भरून तातडीचा पूर्णपणे दायर करणे याचे आव्हान शिंदे सरकार पुढे आहे.

दर्जा व दर याचे नियमन हवे

या शिक्षण खात्यासारखी आरोग्य सेवेचा दर्जा व दर याचे नियमन करण्याची नितांत गरज आहे. 'क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट (रजिस्ट्रेशन अँण्ड रेग्युलेशन) अॅक्ट'मधील नियमांमध्ये काही चांगल्या सुधारणा नोव्हेंबर २०२१ केल्या आहेत, तरी हाक या बाबत राष्ट्रीय मानक आयोगाने पाठविलेल्या मार्गदर्शिकेतील यही मुद्दे पुढे येतील, पण व्यवहारात त्यांची अंमलबजावणी होत नाही.

धोरणाला दिशा मिळाली पण गती हवी

शिक्षण

डॉ. पंडित विद्यासागर
माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ



शैक्षणिक क्षेत्राचा व्यापक विचार करताना शिक्षण, संशोधन आणि प्रशासन या तीन पातळ्यांचा विचार करण्यात आला. यातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विशिष्ट प्राथमिक पावले उचललेली आहेत. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी सादर केलेला अहवाल, प्रा. आर. डी. कुलकर्णी यांची समिती आणि इतर शिक्षणासाठीची डॉ. चितळे करमाळकर यांची सुकाणू समिती यामुळे आराखड्याला दिशा मिळाली आहे. मात्र, त्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार कसे पावले आहे, याला गती मिळण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

प्रशासनाच्या पातळीवरील चौदाव्यचे झाल्यास पुरेसनुसंख्या नेमणुका वेळेत होणे अपेक्षित होते. परंतु, याकडेही तसे पाहले नाही. परिणामी, विद्यार्थ्यांचे नुकसानही प्रभावित झाले. पुरेसनुसंख्या कार्यवाहीसंबंधी माहिती आमरे, त्यामुळे त्यांच्या नेमणुका होण्यासाठी विशिष्ट धोरणाची आवश्यकता आहे. प्राध्यापकभरतीचा मोठा प्रश्न सध्या प्रलंबित आहे, त्यावर पुढाकाराने काम होणे आवश्यक आहे. मात्र, यात काही एपहार दिसत नाही. संशोधनासाठी राज्य सरकारने घरीत तरतूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यापीठांचा आणि एकंदरीत राज्याचा शैक्षणिक दर्जा वाढेल. जागीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत राज्य आघाडीवर असले विशिष्टच चांगली गोष्ट आहे. मात्र, विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावरील अंमलबजावणीसाठी विशिष्ट धोरणाची गरज आहे. 'जी-२०'च्या शैक्षणिक कार्यगटाच्या बैठकीबाबत सरकारचे विशिष्टच अभिनंदन करायला हवे. विद्यार्थीवर्गाला ठिकणी झालेल्या या बैठकांचा शैक्षणिक क्षेत्राला विशिष्टच फायदा होणार आहे. उच्च शिक्षणाच्या तुलनेत प्राथमिक शिक्षणाबाबतीत जागीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत आपण मिळालीचा आहोत. प्राथमिक शिक्षणासाठीचे विशिष्ट धोरण पुढे आले नाही. याकरने पहिल्या पाच वर्षांच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. मात्र, त्याची मानसिकता दिसत नाही.

'प्राथमिक'चाही प्राधान्याने विचार व्हावा

विद्यार्थ्यांचा क्षमता विकास ही संकल्पनाच जागीन आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस पावले उचलायला हवीत. महत्त्वाचे म्हणजे, या सर्वांत उच्च शिक्षणाचा विचार जेवढा झाला तेवढाच प्राथमिक शिक्षणाचाही व्हायला हवा.